




महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

बीड-महाराष्ट्र | शुक्रवार दि.१७ एप्रिल २०२६ | वर्ष ६ वे | अंक २९ | पाने ४ | पान १ | किंमत ३ रुपये

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com














## ▶ घराबाहेर पडताय सावधान!

# महाराष्ट्र रेड झोन मध्ये

मुंबई । वृत्तसेवा

उन्हाचा कडाका आता अधिकच तीव्र झाला असून राज्य उष्णतेच्या 'रेड झोन'मध्ये आले आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, राज्यातील काही जिल्ह्यांचा समावेश 'अति उच्च उष्णता धोका' श्रेणीत करण्यात आला आहे. नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन राज्य सरकारकडून करण्यात आले आहे. महाराष्ट्रासाठी पुढील ४ दिवस अतिशय महत्त्वाचे असणार आहेत.



हवामान खात्याच्या माहितीनुसार, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पुढील चार दिवसांत तापमानात १ ते २ अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता आहे. तर विदर्भासाठी पुढील ४८ तास अत्यंत महत्त्वाचे असून तिथे तापमानाचा पारा ३ अंशांनी चढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यातही उष्णतेची तीव्र लाट जाणवत असून तापमानाने ४० अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. पुढील दोन दिवस पुण्यात उष्णतेची लाट कायम राहण्याचा अंदाज आहे. काही जिल्ह्यांचा समावेश 'उच्च जोखीम श्रेणी'मध्ये करण्यात आल्याने दुपारच्या वेळी विनाकारण घराबाहेर पडणे टाळावे, असे संकेत मिळत आहेत. राज्यात पुढील काही दिवसांत उष्णतेची तीव्र लाट येण्याचा इशारा भारतीय हवामान खात्याकडून देण्यात आला आहे. विविध भागांमध्ये तापमान लक्षणीय वाढण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात १५ ते १८ एप्रिलदरम्यान, मराठवाड्यात १६ ते १८ एप्रिलदरम्यान, विदर्भात १५ ते १९ एप्रिलदरम्यान तर कोकणात १५ ते १७ एप्रिलदरम्यान काही ठिकाणी उष्ण व दमट हवामान राहण्याची शक्यता आहे.

### मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्याचा तापमानाचा पारा ४१ च्या पुढे

* धराशिव - ४१, * संभाजीनगर - ४१ * परभणी- ४२ * बीड - ४३

### बहुतांश जिल्ह्याचा पारा ४० अंशावर

* पुणे - ४१.८, * जळगाव - ४२.८, * सांगली - ४१.८ * सातारा - ४०.९ * सोलापूर - ४३.९ * मालेगाव - ४३.२

### विदर्भातील पारा ४२ च्या पुढे

* अकोला - ४४.२, * अमरावती - ४४ * बुलढाणा - ४२.४ * चंद्रपूर - ४२.६ * गोदीया - ४२ * नागपूर - ४३.४ * वाशीम - ४२.६ * वर्धा - ४३.९ * यवतमाळ - ४२.८

## बीड जिल्ह्यात १७७३ रुग्णांना

# सुमारे १३.६९ कोटीची मदत




बीड । प्रतिनिधी

शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. बीड जिल्ह्यात आर्थिक वर्षात १७७३ रुग्णांना सुमारे १३ कोटी ६९ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि ▶▶पान २ वर

# आजच्या मोर्च्यात हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा-गणपत डोईफोडे



बीड । प्रतिनिधी

मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी आरक्षण ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन करत, सकल मुस्लिम समाजाच्या वतीने उद्या दि.१७ एप्रिल रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या एल्गार मोर्चाला माजी जिप सदस्य गणपत डोईफोडे यांनी जाहीर पाठिंबा दर्शविला आहे. या पार्श्वभूमीवर अठरापगड जाती-धर्मातील नागरिकांनी न्याय हक्कासाठी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. गणपत डोईफोडे यांनी सांगितले की, हा मोर्चा कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा वैयक्तिक स्वार्थासाठी नसून तो संपूर्ण मुस्लिम समाजाच्या न्याय हक्कासाठी आहे. समाजातील शैक्षणिक व सामाजिक मागासलेपण दूर करण्यासाठी शिक्षण, नोकरी तसेच विविध शासकीय योजनांमध्ये मुस्लिम समाजाला ५ टक्के आरक्षण मिळावे, ही दीर्घकाळापासूनची व न्याय्य मागणी असल्याचे त्यांनी नमूद केले. पुढील ▶▶पान २ वर

# भाजपचे नगरसेवक पती सागर देशपांडे यांच्या कुटुंबियांवरील खोटे गुन्हे मागे घ्या

## डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह शिष्टमंडळ एसपींच्या भेटीला

बीड । प्रतिनिधी

शहरातील धोंडीपुरा भागातील भाजपच्या नगरसेविका भाग्यश्री देशपांडे यांचे पती सागर देशपांडे यांच्यावर काही दिवसांपूर्वी झालेल्या भ्याड हल्ल्यानंतर, त्यांच्यासह कुटुंबीयांवर दाखल करण्यात आलेले खोटे गुन्हे तत्काळ मागे घ्यावेत, अशी मागणी भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली ▶▶पान २ वर



## बेलखंडीत पाणंद रस्त्यांमध्ये

# करोडोंचा भ्रष्टाचार!



### कुशल बिले ऑनलाइन करणारा मास्टरमाईंड कोण?

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बेलखंडी येथे नरेगा अंतर्गत बळीराजा पाणंद रस्ते, रस्ता खडीकरण यासारखे अनेक कामे मंजूर आहेत. शून्य कामे असूनसुद्धा मस्टर पेमेंट पूर्ण करून, कुशल बिलासाठी कामे दाखल करण्यात आले आहेत. एकही रस्त्याचे कसल्याही प्रकारे ▶▶पान २ वर

# महिलेचे दोन मणीमंगळसूत्र लंपास

केज । प्रतिनिधी

### संशयित महिला ताब्यात

गावाकडे जाण्यासाठी बसमध्ये चढत असलेल्या महिलेच्या गळ्यातील दोन मणीमंगळसूत्र गर्दीचा फायदा घेत लंपास केल्याची घटना केज येथील बसस्थानकात घडली. संबंधित महिलेने गळ्याला हात लावलेल्या संशयित महिलेस धरून पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. उत्तरेश्वर पिंप्री (ता. केज) येथील अनुसया विक्रम ▶▶पान २ वर

# मुस्लिम समाजाच्या आरक्षण मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

## परमेश्वर सातपुते यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी आरक्षणाची मागणी आता अधिक तीव्र होत आहे. या पार्श्वभूमीवर शुक्रवार, १७ एप्रिल रोजी बीड शहरात मुस्लिम समाजाच्या आरक्षण मागणीसाठी भव्य 'एल्गार मोर्चा' काढण्यात येणार आहे. या मोर्चात मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी केले आहे. मुस्लिम समाजाला आरक्षणापासून दूर ठेवल्यामुळे त्यांच्या शिक्षण व रोजगाराच्या संधींवर परिणाम झाला असून, समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आरक्षण आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तरुण पिढीला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांना योग्य ▶▶पान २ वर



## चिंचोलीमाळी प्राथमिक आरोग्य केंद्राची

# नवी इमारत धूळखात पडून

केज । प्रतिनिधी

चिंचोलीमाळी (ता. केज) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी नव्याने बांधलेली इमारत मागील दोन ते तीन वर्षांपासून पडून आहे. या इमारतीचे हस्तांतरण करण्याऐवजी जुन्या इमारतीच्या दुरुस्तीवर लाखो रुपयांची उधळपट्टी करण्याचा घाट घातला आहे. म्हणून नवी इमारत वापरासाठी ताब्यात घेण्यात यावी, जुन्या इमारतीवर दुरुस्ती साठी खर्च करण्यात येऊ नये, अशी मागणी विठ्ठल ▶▶पान २ वर



## बीड येथील कृषी प्रदर्शनात येणार

# शेतकऱ्यांनी पिकवलेले विक्रीसाठी धान्य!

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यातील शेतकर्यांना तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने गेल्या १८ वर्षांपासून किसान कृषि विकास प्रतिष्ठानच्या या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. या वर्षी

### ६ फुटी सरडा ठरणार आकर्षण

प्रथमच बीड येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडागणा मध्ये दिनांक ▶▶पान २ वर



# महाराष्ट्र तापला!



राज्यावर सध्या सूर्याचा प्रकोप झालेला दिसतो. संपूर्ण महाराष्ट्र उन्हाच्या तीव्र झळांनी होरपळला आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या ताज्या अंदाजानुसार विदर्भासह राज्याच्या अनेक भागात उष्णतेची लाट येण्याची दाट शक्यता आहे. कोकण किनारपट्टीवरील जिल्ह्यांमध्ये उकाडा अस झाला आहे. ही परिस्थिती पाहून प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. विदर्भात उन्हाचा चटका सर्वाधिक जाणवत असून अकोला येथे यंदाच्या हंगामातील उच्चांकी ४३.१अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. हे सोमवारी नोंदवण्यात आलेले देशातील सर्वाधिक तापमान ठरले. अकोला पाठोपाठ विदर्भातील इतर शहरांमध्येही पारा चढलेलाच आहे. अमरावती आणि वर्धामध्ये ४२ अंश सेल्सिअस तर चंद्रपूर, नागपूर, वाशिम आणि गडचिरोलीमध्ये ४१ अंशापेक्षा जास्त तापमानाची नोंद झाली. याशिवाय उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, जळगाव, धुळे, सोलापूर, परभणी येथेही तापमान ४१ अंशाच्या पुढे गेले आहे. ठाणे आणि राजगड जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने 'यलो अलर्ट' जारी केला आहे. १५ एप्रिलपासून विदर्भासह राज्याच्या इतर भागात उष्णतेची लाट अधिक तीव्र होण्याचे संकेत आहेत. बिहारपासून तामिळनाडूपर्यंत विस्तारलेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे हवामानात हे बदल होत आहेत. वाढत्या उष्णतेमुळे होणारे आजार आणि मृत्यू रोखण्यासाठी राज्य सरकारने तीन व्यापक मानक कार्यपद्धती लागू केल्या आहेत. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, विशेषत: उघड्यावर काम करणारे मजूर आणि खाण कामगारांच्या सुरक्षिततेसाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. उष्णतेचा सर्वाधिक धोका असलेल्या जिल्ह्यांमध्ये लातूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, अकोला, बुलडाणा, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, जळगाव, नंदुरबार, धुळे आणि नांदेड यांचा समावेश आहे. चंद्रपूरमधील कोळसा खाण कामगारांसाठी आणि कमी उत्पन्न गटातील नागरिकांसाठी उष्णता-प्रतिरोधक गृहनिर्माण व्यवस्था करण्यावर सरकार भर देत आहे. दुपारच्या वेळी तापमान ४० अंशाच्या पार जात असल्याने शक्यतो घराबाहेर पडणे टाळणे, सतत पाणी पिणे आणि कडक उन्हापासून स्वत:चा बचाव करणे आवश्यक आहे. विदर्भातील तापमानाने जागतिक विक्रम मोडण्यास सुरुवात केली आहे. हवामान विभागाच्या ताज्या आकडेवारीनुसार जगातील १० सर्वांत उष्ण शहरांच्या यादीत विदर्भातील तब्बल ४ शहरांचा समावेश आहे. यात अकोला हे जगातील दुसरे सर्वांत उष्ण शहर ठरले आहे. अकोल्यात तापमानाचा पारा ४३ अंशाच्या पुढे गेला आहे. टॉप १० मध्ये चंद्रपूर, ब्रह्मपुरी आणि वर्धा या शहरांचाही समावेश आहे. या शहरांमधील तापमान सातत्याने ४२ ते ४५ अंशादरम्यान राहत आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते जर उष्णतेची हीच लाट कायम राहिली तर मे महिन्यात पारा ५० अंश सेल्सिअस ओलांडण्याची शक्यता नाकारता येत नाही. राज्यात बहुतांश ठिकाणी अंगाची लाही-लाही होत असून उन्हाचा पारा चांगलाच चढला आहे. कमाल तापमान चाळीशी पार गेले आहे. सोलापूर आणि सांगली जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा धोका असून हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे. मुंबईसह राज्यातील ८ जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. हवामान कोरडे, उष्ण आणि काही भागात दमट राहण्याचा अंदाज आहे. वाढत्या उन्हामुळे उष्माघात होण्याच्या संख्येत वाढ होत आहे. उष्माघाताच्या घटना रोखण्यासाठी राज्य सरकारकडून ऑरेंज आणि रेड अलर्ट देण्यात आले आहेत. विदर्भ, मराठवाडा आणि खान्देशात उष्णतेची तीव्रता सर्वाधिक आहे. मुंबई, पुणे, नागपूर आणि नाशिक शहरांमध्ये सिमेंटच्या जंगलामुळे 'अर्बन हीट आयलंड' प्रभाव जाणवत असून तापमान अधिकच वाढत आहे. शेतक-यांसाठी चिंतेची बाब म्हणजे, जून ते सप्टेंबर दरम्यान सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. कडक उन्हामुळे पाणीसाठ्यातही झपाट्याने घट होत असून पुणे, नाशिक सारख्या शहरांमध्ये पाणी कपातीचे संकट ओढवले आहे. जगातील सर्वाधिक तापमान असलेल्या पहिल्या १५ शहरांमध्ये महाराष्ट्रातील पाच तर देशातील एकूण १० शहरांचा समावेश होता. अकोला शहर जगातील सर्वांत उष्ण शहर ठरले. तेथे ४४ अंश तापमानाची नोंद झाली. कर्नाटकातील कलबुर्गी येथेही ४४ अंश तापमानाची नोंद झाली. तापमानवाढीची नेमकी कारणे म्हणजे जागतिक तापमान वाढीचा परिणाम स्थानिक हवामानावर होत आहे. उत्तर-पश्चिम भारताकडून येणा-या उष्ण आणि कोरड्या वा-यांमुळे विदर्भातील तापमानात प्रचंड वाढ होत आहे. कमी झालेली वनसंपदा हेही एक कारण आहे. शहरीकरण आणि वृक्षतोडीमुळे जमिनीची उष्णता शोषून घेण्याची क्षमता वाढली आहे. भौगोलिक स्थिती हेही तापमानवाढीचे एक कारण आहे. विदर्भाची पठारी भौगोलिक रचना सूर्याच्या किरणांना थेट आणि तीव्र बनवते. भारतीय हवामान विभागाच्या (आयएमडी) अंदाजानुसार आगामी ५ ते ७ दिवस विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रात उष्णतेची तीव्र लाट कायम राहणार आहे. मान्सूनचे आगमन होईपर्यंत तापमानात मोठे चढ-उतार पहायला मिळतील. वाढत्या उन्हापासून स्वत:चा बचाव करण्यासाठी खबरदारी घ्यावी लागेल. चक्कर येणे, मळमळणे, तीव्र डोकेदुखी, जास्त ताप जाणवत असेल तर तो उष्माघात असू शकतो. अशावेळी त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधणे आवश्यक आहे. स्वत:ची काळजी घेणे हाच सध्या उष्णतेपासून वाचण्याचा सर्वोत्तम उपाय आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार १६ व १७ एप्रिल रोजी तापमानात लक्षणीय वाढ होऊन ते ४२ अंश सेल्सिअस किंवा त्याहून अधिक नोंदवले जाण्याची शक्यता आहे. दुपारच्या वेळेत उष्णतेची तीव्रता अधिक जाणवणार असून उष्माघाताचा धोका वाढू शकतो. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय दुपारी १२ ते सायंकाळी ४ दरम्यान घराबाहेर पडणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पुरेसे पाणी पिणे, हलके व सैल कपडे परिधान करणे, डोके झाकण्यासाठी टोपी किंवा रुमाल वापरणे तसेच थेट सूर्य प्रकाशापासून दूर राहणे आवश्यक आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांनी विशेष काळजी घ्यावी, असा सल्ला देण्यात आला आहे. शेतकरी, मजूर आणि बाहेरील काम करणा-या व्यक्तींनी कामाचे वेळापत्रक सकाळी किंवा सायंकाळी ठेवावे असे प्रशासनाने सुचविले आहे.

## पान १ वरून

### सुमारे १३.६९...

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत. मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे. ✻ २० गंभीर आजारासाठी मदत : कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते. ✻ सामंजस्य करारातून मदतीचा मार्ग मोकळा : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत. ✻ आर्थिक वर्षातील मदत : १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत बीड जिल्ह्यातील १७७३ रुग्णांना सुमारे १३ कोटी ६९ लाख ३३ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे. रूग्ण व नातेवाईकांची होणारी धावपळ लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्ष, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, सामंजस्य करार आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यातून रूग्णांना वेळेत अर्थसहाय्य होत आहे. गरजू रूग्णांनी योजनेचा लाभ घेण्याकरिता आणि अधिक माहितीकरिता १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

### आजच्या मोर्च्यात...

पिढीचे भवितव्य सुरक्षित ठेवण्यासाठी हा लढा आवश्यक असून, या ऐतिहासिक आंदोलनात सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

### करोडोंचा भ्रष्टाचार...

काम नसताना सुद्धा, कुशल पेमेंट काढणे म्हणजे, प्रशासनाची शुद्ध फसवणूक करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना रस्त्याची अडचण भासू नये, गरजवंतांना रस्ता भेटला पाहिजे, पारदर्शक पद्धतीने कामे झाली पाहिजे. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली जी राम जी सारखी पारदर्शक यंत्रणा अस्तित्वात आणली. परंतु शासनच्या डोळ्यात धूळ टाकून, कामे न करताच करोडो रुपयाचा भ्रष्टाचार करणारे गुत्तेदार आणि अधिकारी कोण ? त्यांच्यावर कारवाई होणार का ? हा प्रश्न कायम तसाच राहिला आहे. बेलखंडी येथील हा प्रकार अत्यंत खेदजनक व निंदनीय आहे. ग्रामसेवक, सरपंच, इंजिनीअर आणि ऑपरेटर यांना माहिती नसताना, करोडोंचे कुशल बिले ऑनलाईन करणारा मास्टरमाइंड कोण याचा शोध प्रशासनाने घ्यावा. संबधित गुत्तेदार व मास्टरमाइंड यांच्यावर गुन्हा दाखल करून कडक कायदेशीर कारवाई करणे बाबत निवेदन गटविकास अधिकारी बीड यांना दिले असून, कारवाई न केल्यास ग्रामस्थांच्या उपस्थितीत पंचायत समिती समोर आंदोलन करण्याचा इशारा युवा नेते महेश सावंत यांनी दिला आहे.

### मुस्लिम समाजाच्या...

संधी उपलब्ध करून देण्यासाठी हे आरक्षण महत्त्वाची भूमिका बजावेल. हा मोर्चा बीड शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देणार असून, सामाजिक ऐक्य व शांतता राखत सर्व घटकांनी या आंदोलनाला पाठिंबा द्यावा, असे आवाहन शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी केले आहे.

### भाजपचे नगरसेवक...

शिष्टमंडळाने गुरुवारी (दि.१६) पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याकडे केली. पुढे म्हटले आहे की, आरोपींकडून सागर देशपांडे यांच्यासह त्यांचे वडील अरुणराव देशपांडे यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर देशपांडे कुटुंबियांसह भाजपचे पदाधिकारी पोलीस अधीक्षकांची भेट घेण्यासाठी गेले होते. यावेळी भाजपचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर, शहराध्यक्ष अशोक लोढा, संपादक दिलीप खिस्ती, ज्येष्ठ पत्रकार महेश वाघमारे, नगरसेवक जगदीश गुरखुदे, शुभम धूत, डॉ.रविंद्र घुंबरे, अॅड. संगीता धसे, अॅड. दीपक कुलकर्णी, प्रमोद पुसरेकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. माध्यमांशी बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले की, सागर देशपांडे यांच्यावर झालेला हल्ला हा राजकीय वैमनस्यातून झाला आहे. देशपांडे कुटुंबाची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नसताना त्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या घटनेचे स्पष्ट सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध असूनही संबंधितांवर कारवाई करण्यात आलेली नाही, ही बाब चिंताजनक आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याकडे हा प्रकार निदर्शनास आणून देण्यात आला असून, न्याय मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### नवी इमारत...

विनायकराव झाडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. चिंचोली (माळी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची जुनी इमारत जीर्ण व कालबाह्य झाल्यामुळे नव्या इमारत उभारणीसाठी मंजुरी मिळाली होती. मागील दोन ते तीन वर्षांपूर्वी तीन ते साडे तीन कोटी रुपये खर्चून नव्या इमारतीची उभारणी करण्यात आली. संरक्षण भिंतीसह इतर किरकोळ कामे राहिल्याने या इमारतीचे हस्तांतरण झाले नाही. परिणामी, नवीन इमारत धूळखात पडून असून नव्या इमारतीमध्ये गावात, झाडे उगवली आहेत. त्यामुळे या इमारतीचा वापर होण्यापूर्वी दुरावस्था होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान, जुन्या इमारतीच्या दुरुस्तीच्या कामाच्या मंजुरीवर लक्ष केंद्रित करीत दुरुस्तीच्या कामावर लाखो रुपयांची उधळपट्टी करण्याचा घाट घातला आहे. थातूर मातूर दुरुस्तीच्या कामातून जास्तीचे पैसे मिळत असल्याने हे दुरुस्तीचे काम मंजूर करून घेतले जात आहे. नवी इमारत आणखी किती दिवस तशीच पडून ठेवायची असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे जुन्या दुरुस्तीचे काम करण्याऐवजी संरक्षण भिंतीचे काम व इतर राहिलेली किरकोळ कामे पूर्ण करून ही नवी इमारत वापरासाठी ताब्यात घ्यावी. जुन्या इमारतीच्या मलमपट्टीवर लाखो रुपयांची उधळण करू नये, अन्यथा आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा गावातील विठ्ठल विनायकराव झाडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

### शेतकऱ्यांनी पिकवलेले...

०१ते ०५ मे दरम्यान किसान कृषी महोत्सव या कृषि प्रदर्शनात द्वारे बीड भव्य अशा ५ दिवसीय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. प्रदर्शन जय्यत तयारी सुरू असून यंदा कृषी प्रदर्शनामध्ये २०० अधिक स्टॉलचा सहभाग असणार आहे यात विशेष आकर्षण ठरणार आहे ते मुंबई येथील प्राणी मित्र किशोर चव्हाण यांचा भारतातील सर्वात मोठा ६ फुट लांब व तब्बल २० किलो वजन असणारा सरडा (इगवाना ) हा या प्रदर्शनात बीड जिल्ह्यातील प्राणी प्रेमींना पाहण्यास मिळणार आहे तसेच शेतमजुरीला पर्याय ठरणारे अवजारांचे दालनात विविध लागणारे विळ्या खुरप्यापासून ते ऊस तोडणी यंत्रापर्यंत सर्व प्रकारच्या मजुरीला पर्याय ठरणाऱ्या अवजाराचे दालन विशेष आकर्षण ठरणार आहे तर शेतकऱ्याने आपल्या शेतामध्ये उत्पादित केलेला माल थेट स्वतः शेतकरी या प्रदर्शनात धान्य महोत्सवाच्या माध्यमातून विक्री करण्यासाठी ठेवणार आहेत या अनुषंगाने प्रदर्शनाची जय्यत तयारी सुरू असून या प्रदर्शनाचा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आव्हान कृषी प्रदर्शन आयोजन समितीचे संयोजक कृषिभूषण महेश बेदरे यांनी केले आहे. मराठवाड्यातील शेतकर्यांना नवतंत्रज्ञान मिळावे म्हणून येथील किसान कृषी विकास प्रतिष्ठान मराठवाडाभर बीड, जालना, परभणी, हिंगोली सह इतर ठिकाणी या कृषी प्रदर्शनाचे आयोजन करते बीड जिल्ह्यातील शेतकर्यांच्या आग्रहाने गेवराई पाठोपाठ बीड येथे या प्रदर्शनाचे आयोजन प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी फेडरेशन, ओंकार साखर कारखाना, ऑल इंडिया डीलर ऍग्रो इनपुट असोसिएशन यांचा यात विशेष सहभाग प्रदर्शनात असणार आहे. कृषी प्रदर्शनात भव्य अशा आठ दालनात द्वारे तब्बल २०० कृषी उत्पादनांची स्टॉल यामध्ये असून कृषी अवजारांची प्रात्यक्षिके या प्रदर्शनात पाहण्यास मिळणार आहे, एकदिवसीय पशुप्रदर्शन, डॉग शो तज्ज्ञांची चर्चासत्रे आदी उपक्रम या प्रदर्शनात होणार आहे विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन व समारोप प्रसंगी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा या शेतक यांचा गौरव करण्यात येणार आहे. प्रदर्शनात विविध कार्यक्रमाचे रिसेल चालणार असून ५ दिवसांमध्ये या प्रदर्शनाचा बीड शहरासह जिल्ह्यातील शेतकर्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने संयोजक कृषिभूषण महेश बेदरे यांनी केले आहे. ✻शेतकऱ्यांना दिला जाणार मोफत स्टॉल : शासनाच्या मदतीविना हे प्रदर्शन होत असून गेल्या १८ वर्षापासून शासनाच्या कोणत्याही अनुदानाशिवाय ही संस्था हे प्रदर्शन सातत्याने आयोजित करते यावेळी प्रथमच जिल्ह्यातील उत्कृष्ट दर्जाचा उत्पादित केलेला धान्य माल थेट ग्राहकांच्या च्या दारात मिळावा या उद्देशाने शेतकऱ्यांना मोफत स्टॉल दिला जाणार आहे.

### महिलेचे दोन...

चंदनशिव या १५ एप्रिल रोजी कामानिमित्त केजला आल्या होत्या. परत गावाकडे जाण्यासाठी दुपारी ३ वाजता नांदूरघाट बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत त्यांच्या गळ्यातील ३५ हजार रुपये किंमतीचे ७ ग्रॅमचे दोन मणीमंगळसूत्र लंपास केले. याचवेळी त्यांच्या पाठीमागून गळ्याला हात लावून मणीमंगळसूत्र चोरत असल्याचा संशय आल्याने त्यांनी लगेच हात पकडला. दोन ते तीन वर्षाचे मूल कडेला घेऊन असलेल्या वैशाली शिवाजी धोत्रे (रा. हनुमान नगर, पाथरी ता.जि. परभणी) या महिलेस पकडून तिच्याकडे चोरीला गेलेल्या मणीमंगळसूत्रची मागणी केली. मात्र तिने परत न केल्याने बसस्थानकावर ड्युटीस असलेले होमगार्ड प्रकाश मस्के यांनी महिला होमगार्ड काकडे व गव्हाणे यांना बोलवून या महिलेस ताब्यात दिले. अनुसया चंदनशिव यांच्या फिर्यादीवरून वैशाली धोत्रे या संशयित महिलेविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सहाय्यक फौजदार राजू वाघमारे हे तपास करताहेत. दरम्यान, या महिलेस न्यायालयात हजर केले असता १८ एप्रिल पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

## आ. सुरेश धस यांच्या हस्ते ट्रॅक्टर व कृषी अवजारांचे वितरण



आष्टी । प्रतिनिधी

आ. सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी तहसील कार्यालय, आष्टी येथे खरीप हंगाम २०२६ पूर्व नियोजन बैठक उत्साहात पार पडली. आगामी हंगामाच्या अनुषंगाने शेती क्षेत्रातील विविध योजना, आवश्यक साधनसामग्रीची उपलब्धता तसेच शेतकऱ्यांच्या अडचणींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीदरम्यान कृषी विभागाच्या ऊइढ (ऊळीशलीं इशपशषळीं ढीरपीषशी) पोर्टल अंतर्गत शेतकरी बांधवांना अनुदान योजनांमधून ट्रॅक्टर तसेच विविध आधुनिक कृषी अवजारांचे वितरण आ.सुरेश धस यांच्या हस्ते करण्यात आले.आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेती अधिक सक्षम व उत्पादनक्षम करण्याच्या दिशेने हा महत्त्वाचा उपक्रम ठरला. तसेच गोपीनाथराव मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत दुर्दैवी मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना सानुग्रह अनुदानाचे हमीपत्र देखील देण्यात आले. या माध्यमातून संकटकाळात कुटुंबांना मोठा आर्थिक आधार मिळणार आहे. यावेळी निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी साहेब, उपविभागीय महसूल अधिकारी श्रीमती कविता जाधव, श्रीमती वसीमा शेख, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, शेळके साहेब, गांगर्डे साहेब, कृषी विस्तार अधिकारी, कृषी सेवा केंद्रांचे विक्रेते तसेच मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते. बैठकीदरम्यान शेतकऱ्यांनी विविध समस्यांवर मते मांडली असून प्रशासनाकडून त्या सोडविण्याचे आश्वासन देण्यात आले. खरीप हंगाम सुरळीत व यशस्वी पार पाडण्यासाठी प्रशासन व कृषी विभाग सज्ज असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.




Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र



# पुन्हा ट्रान्सफर... IAS जी श्रीकांत यांची १५ दिवसांत दुसरी बदली; राज्यातील ४ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा धडका सुरुच असून कालच ५ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. त्यानंतर, आज पुन्हा एकदा चार आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, या चार अधिकाऱ्यांमध्ये जी. श्रीकांत यांचाही समावेश आहे. जी श्रीकांत हे सध्या नवी मुंबई जल जीवन मिशन अभियानाचे संचालक म्हणून कार्यरत आहेत. मात्र, आता त्यांना छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय आयुक्तपदी नियुक्ती देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, ३ एप्रिल रोजीच त्यांची जल जीवन मिशन नवी मुंबई येथे मिशन संचालक पदावर बदली करण्यात आली होती. त्यामुळे, गेल्या १५ दिवसांत ही त्यांची दुसरी बदली आहे.

जी.श्रीकांत हे २००९ च्या युपीएससी बॅचचे आयएएस अधिकारी असून गेल्या १५ दिवसांपूर्वी ते छत्रपती संभाजीनगर मनपाचे आयुक्त होते. मात्र, ३ एप्रिल रोजी अभियान संचालक, जल जीवन मिशन, नवी मुंबई येथे त्यांची बदली करण्यात आली होती, ते तिथे कार्यरतही होते. आता, त्यांची विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर विभाग, येथे नियुक्ती करण्यात आली. तर, जितेंद्र पापळकर विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर विभाग यांची GST, मुंबई सह आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पापळकर हे २०१० च्या युपीएससी बॅचचे IAS अधिकारी आहेत. जी. श्रीकांत यांच्याजागी गंगाथरण डी. यांची मिशन डायरेक्टर, जल जीवन मिशन, नवी मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. गंगाथरण हे २०१३ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. यासह, जगदीश मिनियार मुख्य प्रशासक (नवीन टाउनशिप), सिडको, छत्रपती संभाजी नगर यांची महिला व बालक आयुक्त पुणे या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. मिनियार हे २०१५ च्या बॅचचे युपीएससी उत्तीर्ण अधिकारी आहेत.




दरम्यान, कालच पाच अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश निघाले होते, त्यानंतर आणखी चार अधिकाऱ्यांची बदली करण्यात आल्याने प्रशासकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे.

१५ एप्रिल रोजी बदली केलेले अधिकारी- डॉ. बी. एन. पाटील (आयएएस: नॉन-एससीएस: २०१४), संचालक, पर्यटन, मुंबई यांची प्रकल्प संचालक, रुसा, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई येथे बदली झाली आहे. मंगेश जोशी (आयएएस: एससीएस: २०१५), उपमहासंचालक, यशदा, पुणे यांची संचालक, पर्यटन, मुंबई येथे बदली झाली आहे. यासह, सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम (आयएएस: आरआर: २०२०), यांची अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी येथे बदली करण्यात आली आहे. कुशल जैन (आयएएस: आरआर: २०२२), प्रकल्प अधिकारी, आयटीडीपी, अहेरी आणि सहायक जिल्हाधिकारी, अहेरी उपविभाग, गडचिरोली यांची मुख्य सोलापूर जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अधिकारी पदावर बदली करण्यात आली आहे. तर, रेवैया डोंगरे (IAS:RR:2023) सहायक जिल्हाधिकारी, भूम उपविभाग, धाराशिव यांना यवतमाळ येथे प्रकल्प अधिकारी, ITDP, पांढरकवडा आणि सहायक जिल्हाधिकारी, केळापूर उपविभाग म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे.



*भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, कायदेमंत्री, अर्थशास्त्रज्ञ, समतायुगप्रवर्तक,महानायक, प्रज्ञासूर्य, धम्मचक्रप्रवर्तक, कायदेपंडित, बोधिसत्व, युगंधर, जागतिक नेता, कुशल संघटक, इतिहासनायक विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर याच्यां जयंती निम्मित अभिवादन करताना परशुराम भैय्या गुरखुदे नगरसेवक देशपांडे, व द्वारकाधीश मित्र मंडळ.*

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त पत्रकार संतोष ससाणे पत्नी शितल ससाणे या दांपत्याचा मरणोत्तर देहदानाचा संकल्प !

**आष्टी । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्यंत प्रतिगामी परिस्थिती असताना या देशातील शोषित, पीडित,शूद्र अति शूद्र व महिलांसाठी जे कार्य केले ते अतुलनीय आहे.पशुवत जीवन असलेल्या शूद्र अति शूद्रांचा स्वाभिमान जागा केला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या संपूर्ण जीवनामध्ये खूप त्याग, कष्ट, हाल, अपेष्टा सहन करत वेळप्रसंगी आपल्या कुटुंबाची ही परवा न करता आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घालून बहुजन उद्धाराचे कार्य केले,त्यांनी आपल्या असामान्य ज्ञानाच्या जोरावर जगातील सर्वोत्कृष्ट संविधानिक लोकशाही व्यवस्था निर्माण करून देशवासीयांना स्वाभिमानाने,सन्मानाने, जीवन जगता यावे यासाठी सर्वांना समान हक्क अधिकार दिले आणि करोडो बहुजनांचा उद्धार केला.कितीही जन्म घेतले त्यांच्या उपकाराची परतफेड करणे अशक्य आहे,परंतु त्यांनी आपल्या अनुयायाकडून एवढीच अपेक्षा व्यक्त केली होती की,मी महत प्रयासाने



समाज विकासाचा गाडा इथपर्यंत आणला आहे तो पुढे नेण्यासाठी तुम्ही प्रयत्न करावा परंतु तो मागे हटता कामा नये,त्यांनी समाजाच्या विकासासाठी याच भारत भूमीतील सर्वोत्तम भूमिपुत्र भगवान गौतम बुद्धांच्या धम्म दिला, त्याचे अनुकरण व त्याचा प्रचार प्रसार करण्याचे तरुणांना सांगितले,त्यांच्या विचारावर चालत असताना, सामाजिक धार्मिक कार्य करत असताना, त्यांच्या विचारातून प्रेरणा घेऊन आयुष्यभर त्यांच्या विचाराचं त्यांनी दिलेल्या विज्ञानवादी बौद्ध धम्माच कार्य करत राहण्याचा वसा घेतलेले आष्टी तालुक्यातील धामणगाव येथील सामाजिक कार्यकर्ते म्हणजे संतोष ससाणे आणि त्यांच्या पत्नी शितल ससाणे. या ससाणे दांपत्यांनी या वर्षी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीच्या निमित्ताने मरणोत्तर देहदान करण्याचा संकल्प करत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना जयंतीदिनी अनोखे अभिवादन केले आहे,आयुष्य संपल्यानंतर या देहाची राख रांगोळी, माती होण्यापेक्षा, तो आपला देह वैद्यकीय महाविद्यालयात शिकणाऱ्या शिकाऊ डॉक्टरांना प्रयोगासाठी उपयोगी ठरावा, त्यातून त्यांना अजून मानवी जीवनासाठी सखोल अभ्यास करता यावा यानिमित्ताने आपला देह मरणोत्तरही समाजासाठी कामी यावा, या सामाजिक आणि बुद्ध धम्माच्या दान पारमितीच्या पालन या भावनेतून त्यांनी मरणोत्तर आपला देह स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई येथील वैद्यकीय महाविद्यालयासाठी स्व ईच्छेने अर्ज करत,घोषणापत्र देत देहदान करण्याचा संकल्प केल्याचे पत्र वैद्यकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय आष्टी यांच्याकडे सुपूर्त केला, त्यांच्या या निर्णयाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे,यावेळी आरोग्य अधिकारी रामदास मोराळे, आष्टी भीमजयंती अध्यक्ष सुनील शिंदे सर, जेस्ट पत्रकार प्रफुल्ल सहस्रबुद्धे, रिपाई नेते अरुण निकाळजे, बोद्ध महासभा तालूका अध्यक्ष रत्नकांत निकाळजे,सरचिटणीस आकाश कांबळे, आष्टी शहर अध्यक्ष किशोर निकाळजे, विजय काळे सुनील साळवे, रिपाई युवा कुणाल निकाळजे, समता सैनिक काळे आदि उपस्थित होते.

## रक्ताचा रंग एकच' : पालीत भीम जयंतीनिमित्त सामाजिक एकतेचे प्रेरणादायी दर्शन



**पाली । प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त पाली येथील नालंदा बुद्ध विहार येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात तब्बल ५१ रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून मानवतेचा संदेश दिला. या रक्तदान शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे हिंदू, मुस्लिम आणि बौद्ध बांधवांनी एकत्र येत सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचे अनोखे उदाहरण घालून दिले. रक्ताचा रंग एकच हा संदेश देत सर्व समाजातील तरुणांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान केले. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन व बुद्ध वंदनेने झाली. त्यानंतर गावातील विविध घटकांतील नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेत रक्तदान केले. यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतात सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका समाजापुरते मर्यादित नव्हते, तर ते संपूर्ण राष्ट्राचे नेते होते. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी एकत्र येऊन एखाद्याचे प्राण वाचवण्याचा संकल्प केला, हीच त्यांना खरी मानवंदना आहे. आजच्या काळात जिथे समाजात विभागणीची दरी निर्माण होताना दिसते, तिथे पाली येथील या उपक्रमाने एकतेचा आणि मानवतेचा नवा आदर्श निर्माण केला आहे. रक्ताला ना जात असते, ना धर्म ही भावना या शिबिरातून प्रभावीपणे अधोरेखित झाली. या उपक्रमामुळे पाली परिसरात उत्साहाचे आणि ऐक्याचे वातावरण निर्माण झाले असून, समाजमाध्यमांवरही या प्रेरणादायी उपक्रमाची जोरदार चर्चा रंगत आहे.

## सम्राट अशोक नगर येथे भीमजयंती साजरी

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील सम्राट अशोक नगर येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती अत्यंत उत्साहपूर्ण आणि जल्लोषात साजरी करण्यात आली. परिसरात निळ्या पताकांनी सजावट करण्यात आली होती, तसेच सर्वत्र आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले होते. दि. १४ रोजी सकाळी १० वाजता विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी 'जय भीम'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला. ध्वजारोहणानंतर यशोधरा महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बुद्ध वंदना घेण्यात आली.

उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रिपब्लिकन सेनेचे युवा नेते विजय दादा साळवे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते जयसिंह भैय्या सोळंके, विरेंद्र दादा सोळंके, माजी नगराध्यक्ष तथा रिपाई तालुकाध्यक्ष अविनाश तात्या जावळे, माजी सभापती गयाबाई एकनाथ आव्हाड ( जीजी ) नगरसेवक दिपक मेंडके, कल्याण आबुज , पी.आर.पी. तालुकाध्यक्ष राकेश दादा साळवे, वंचितचे युवा नेते भारत



तांगडे यांच्यासह बाबासाहेब भोजने, अशोक कांबळे, ॲड. नंदकिशोर खळगे, पत्रकार रवींद्र राऊत, अमर साळवे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षण, समानता, बंधुता आणि सामाजिक न्याय या तत्त्वांचा अंगीकार करून समाजाने प्रगती साधावी, असे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमाला युवक-युवतींचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी मोठ्या उत्साहाने या सोहळ्यात सहभाग नोंदवला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व सिद्धार्थ ससाणे , शत्रुघ्न कसबे , प्रशांत जाधव , नितीन जावळे, ॲड प्रविन सोनवणे . अनिल भराटे , अजय साळवे , सिद्धार्थ खिल्लारे , आबा उजगरे ,अनिल मोरे , आनंद शिंदे , रोहीत साळवे , विशाल मराठे , सचिन जावळे , सोनु मगरे ,धम्मा देशमाने , राहूल भद्रे , बुद्धीराज सिरसट केतन शिरसागर , संग्राम गायकवाड , आकाश भद्रे , वैराळे नाना , नितीन गायकवाड , मिलींद वाव्हळकर , चंद्रगुप्त डोंगरदिवे आदिंनी परिश्रम घेतले. तसेच सम्राट अशोक नगर परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामान्य माणसाच्या न्याय व सन्मानासाठी व्यवस्थेविरुद्ध लढले: प्रो.डॉ. प्रल्हाद लुलेकर

### बलभीम महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात प्रतिपादन

**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य हे समाजातील प्रत्येक वंचित, शोषित घटकांसाठी असून त्यांनी शेतकरी, कामगार यांच्या न्यायासाठी तसेच जलसंधारण, नदीजोड प्रकल्प, आर्थिक प्रश्नांवर यासोबतच समाजासाठी विधायक कार्य करणाऱ्या सुधारकांचे मोफत खटले लढले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अनंत पैलुंचे सामाजिक योद्धा असून त्यांचे कार्य हे सामान्य माणसाच्या न्याय व आत्मसन्मानासाठी असल्याचे प्रतिपादन जेष्ठ विचारवंत तथा सुप्रसिद्ध साहित्यिक प्रो.डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी केले. येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने दि. १५ एप्रिल




२०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.संतोष उंदरे होते तर मंचावर उपप्राचार्य डॉ.बाबासाहेब कोकाटे, आय.क्यु.ए.सी.समन्वयक डॉ.अनिल चिंधे, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. रविंद्र काळे, प्रबंधक पी.पी. पी.डावकर, कार्यालय अधीक्षक किसन सागडे यांची प्रमुख उपस्थिती होती. आपल्या मार्गदर्शनात डॉ. प्रल्हाद लुलेकर म्हणाले की, मुंबई येथे शेतकऱ्यांचा पहिला मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काढून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर काम केले यासोबतच कामगारांच्या प्रश्नांवर देखील काम करून कामगारांना न्याय मिळवून दिला. नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून जलसंधारणाचे कार्य केले तसेच संशोधन करून आर्थिक प्रश्नांवर देखील महत्वाचे कार्य त्यांनी केले. डॉ. लुलेकर म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामान्यांच्या न्यायासाठी व सर्व स्तरातील शोषणाविरोधात लढले. यासोबतच त्यांनी राज्यघटना निर्मितीत दिलेले अतुलनीय योगदान, संविधान सभेतील कार्य, सामान्य माणसांचे लढलेले खटले यावर सविस्तर मार्गदर्शन केले. आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात प्राचार्य डॉ.संतोष उंदरे म्हणाले की, महापुरूषांनी समाजातील प्रत्येक घटकासाठी कार्य केले असून आपण महापुरूषांना एका चौकटीत बंदिस्त करून त्यांचे कार्य मर्यादित केले आहे.

## मुस्लिम आरक्षण मोर्चाला कुंडलिक खांडे यांचा पाठिंबा

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील मुस्लिम समाजाला शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात न्याय हक्क मिळावेत,या प्रमुख मागणीसाठी बीड येथे १७ एप्रिल रोजी होणार्या भव्य मुस्लिम आरक्षण मोर्चा चे आयोजन करण्यात आले आहे.या मोर्चाला सरपंच-उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. कुंडलिक खांडे यांनी सांगितले की, मुस्लिम समाज शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेला असून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षणाची गरज आहे. या मागणीसाठी होणारे आंदोलन हे लोकशाही मार्गाने असून, शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी त्यांनी मागणी केली. तसेच, या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होऊन मुस्लिम समाजाच्या हक्कासाठी आवाज उठवावा, असे आवाहनही त्यांनी नागरिकांना केले आहे.

## बालाघाट प्रतिष्ठानकडून मुस्लिम आरक्षण मोर्चाला सहकार्याचे आवाहन; बीड येथील महामोर्चासाठी मदतीचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक १७ मार्च रोजी बीड येथे कलेक्टर कार्यालयावर मुस्लिम आरक्षणाच्या मागणीसाठी महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर बालाघाट प्रतिष्ठानच्या वतीने बालाघाट व परिसरातील सर्व समाजसेवकांनी या मोर्चाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

बालाघाट प्रतिष्ठानच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या आवाहनात म्हटले आहे की, मराठा आरक्षण चळवळीमध्ये मुस्लिम बांधवांनी मोलाचे सहकार्य केले आहे. त्या सहकार्याची उत्तराई म्हणून मुस्लिम बांधवांच्या आरक्षणाच्या मागणीला पाठबळ देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे. या निवेदनात मुस्लिम समाजालाही शैक्षणिक आरक्षणाची गरज असून त्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. अनेक मुस्लिम बांधव हातावर पोट भरणारे काम करून आपली उपजीविका चालवत असून, आर्थिक अडचणींमुळे मुलांना दर्जेदार शिक्षण देणे कठीण जात असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.तसेच स्वर्गीय विनायक राव जी मेटे यांनी विधिमंडळात मुस्लिम समाजाचा प्रश्न उपस्थित करून काही प्रमाणात आरक्षण मिळवून दिल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. मात्र, युती सरकारच्या काळात ते टिकवता आले नाही, त्यामुळे पुन्हा मुस्लिम समाजाला न्याय देत आरक्षण देण्याची मागणी करण्यात आली आहे.

मोर्चासाठी बीडकडे जाणाऱ्या वाहनांना प्रवासादरम्यान चहा, पाणी, नाश्ता तसेच आवश्यक त्या ठिकाणी सहकार्य करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. या मदतीद्वारे मुस्लिम समाजाच्या आंदोलनाला पाठिंबा देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. बालाघाट प्रतिष्ठानच्या वतीने तसेच नामदेव घोडके सर यांनी हे आवाहन केले आहे.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शुक्रवार दि. १७ एप्रिल २०२६ •

## थोडक्यात...

### तलवाडा पोलीस स्टेशनचे वराती मागुन घोडे यात्रेला आठवडा लोटल्यावर घेतली शांतता बैठक



**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन म्हणजे व्यावसायिक दृष्टया कसे का आसेना ज्या त्या अधिका–यांच्या सर्व्हिस काळात तलवाडा पोलीस स्टेशनच्या हाद्दित शांतता सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी सातत्याने कुठलाही सन वार ऊत्सव महापुरुषांच्या जयंत्या आसो तत्पुरविच चार सहा दिवस आधिच सुरक्षेच्या दृष्टिकोणातुन हाद्दितील नागरिकांना पोलीस स्टेशनला पाचरण करुन शांतता समितीची बैठक बोलाऊन जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या सुचनेचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश उपस्थितांना देत आसत. परंतु यंदा तलवाडा पोलीस स्टेशनच्या पदाधिका–यांनी वराती मागुन घोडे दवडल्याचा प्रकार घडल्याने चविने चर्चा होतांना ऐकावयास मिळत आहे. त्याचे झाले आसे की प्रतिवर्षा प्रमाणे तलवाडा येथील जाज्वल्य दैवत माता त्वरितादेवीचा यात्रा ऊत्सवाची सुरवात होऊन एक आठवडा लोटल्यावर शांतता समितिची बैठक घेण्याचे भान तलवाडा पोलीसांना सुचले वास्तविक पहाता यात्रेची सुरुवात होण्यापुर्वीच किंवा कुठलाही ऊत्सव शांततेत पार पडावा म्हणुन तत्पुरविच प्रतिवर्ष बैठक घेण्यात येते परंतु यंदा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती १४ एप्रिल रोजी पार पडल्यावर संध्याकाळी यात्रा ऊत्सव व जयंती निम्मीत शांतता समितिची बैठक तलवाडा पोलीस स्टेशनला पार पडल्याने तलवाडा पोलीस स्टेशनचे वराती मागुन घोडे आशी चर्चा परिसरात ऐकावयास मिळत आहे.

### माजी विद्यार्थी स्नेह मेळावा उत्सवात संपन्न



**केज । प्रतिनिधी**

जीवन प्रगती विद्यालय नांदूर घाट येथे १९९३/९४ च्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा रविवार १२ एप्रिल २०२६ रोजी जीवन प्रगती विद्यालय नांदूर घाट येथे संपन्न झाला. या विद्यार्थी मेळाव्यासाठी प्राचार्य ढाकणे सर,तत्कालीन शिक्षक श्री राम मोराळे सर,व्हिडी जाधव सर,गिरी सर, धर्माधिकारी सर, तोगे सर, तांबडे सर, सतीश मोराळे सर व इतर मान्यवर उपस्थित राहून त्यांनी मार्गदर्शन केले या माजी विद्यार्थी मेळाव्यात मध्ये डॉ.सतीश तांबडे, इंजि मनोज पुजारी, प्रा.डॉ. अरुण राख, मा. सैनिक ईश्वर गपाट, पीआय बाळासाहेब आघाव,मनपा अधिकारी विक्रम जाधवर,चांगदेव शेंडगे औदुंबर ढाकणे हनुमंत आंधळे जयंत चौधरी, जीवन हांगे,भाऊसाहेब खाडे इत्यादी. व इतर अनेक विद्यार्थी मित्र सहभागी झाले. त्यांनी शालेय जीवनातील आपल्या आठवणींना उजाळा दिला या मेळव्या मध्ये शिक्षक व शिक्षक इतर कर्मचाऱ्यांचा शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. या मेळाव्यासाठी १९९३/९४ च्या दहावीच्या बॅचचे ६५ माजी विद्यार्थी उपस्थित होते. मोठ्या उत्साहाने व आनंदाने सर्व मित्रांनी एकमेकांची गळाभेट घेऊन हसत मुखाने कार्यक्रमाचा निरोप समारंभ झाला.

### मुस्लिम आरक्षणासाठी १७ एप्रिलच्या मोर्चाला पाठिंबा

**गेवराई । प्रतिनिधी**




मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी आरक्षण ही काळाची गरज आहे. समाजातील येणाऱ्या पिढीचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी १७ एप्रिल रोजी बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या 'मुस्लिम आरक्षण मोर्चा'ला गेवराई नगरपरिषदेचे प्रभाग क्रमांक ११ तय्यब नगर चे नगरसेवक राहुल खंडागळे यांनी आपला जाहीर पाठिंबा दर्शविला आहे. यावेळी बोलताना राहुल खंडागळे म्हणाले की, हा मोर्चा कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा वैयक्तिक स्वार्थाचा नसून, तो संपूर्ण मुस्लिम समाजाच्या न्याय्य हक्कासाठी आहे. शिक्षण, नोकरी आणि विविध शासकीय योजनांमध्ये मुस्लिम समाजाला ५ टक्के आरक्षण मिळावे, ही समाजाची जुनी आणि रास्त मागणी आहे. आजही समाजातील अनेक तरुण संधीअभावी मागे राहत आहेत. त्यामुळे आपल्या मुलाबाळांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा लढा अत्यंत आवश्यक आहे. मुस्लिम समाजाला आरक्षणापासून वंचित ठेवल्यास पुढील पिढ्यांचे मोठे नुकसान होईल, अशी भीती व्यक्त करत त्यांनी सर्व समाजबांधवांना आवाहन केले आहे. या ऐतिहासिक लढ्यात प्रत्येक तरुण, ज्येष्ठ नागरिक आणि आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवून मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन नगरसेवक राहुल जिजा खंडागळे यांनी प्रभाग क्रमांक ११ व तय्यब नगर भागातील नागरिकांच्या वतीने पाठिंबा दिला आहे.

## येत्या पाच दिवसांत पोलिसांनी उमापूरच्या एसबीआय मॅनेजर भूपेंद्र लारोकरला अटक न केल्यास लोकशाही मार्गाने आमरण उपोषणाला बसणार!

# पत्रकार नवनाथ आडे यांचा थेट पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांना पाच दिवसांचा अल्टिमेटम

### कायद्याचा धाक संपलाय का? गुन्हा दाखल तरी अटक नाही; एसबीआय मॅनेजरला वाचवतोय कोण?

**तलवाडा । प्रतिनिधी**

दिव्यांग पत्रकार नवनाथ आडे यांच्यावर झालेल्या अन्यायप्रकरणी आता न्यायाची मागणी अधिक तीव्र झाली आहे. दिनांक ०६ मार्च २०२६ रोजी चकलांबा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५८/२०२५, अपंग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ च्या कलम ९२ अंतर्गत गुन्हा दाखल होऊनही अद्याप आरोपीला अटक न झाल्याने अजूनही पोलिसांच्या आवाक्याबाहेर असल्याने संताप व्यक्त होत आहे. सदर प्रकरणातील आरोपी भूपेंद्र लारोकर (वय ५०), हे स्टेट बँक ऑफ इंडिया, उमापूर शाखेचे व्यवस्थापक असून, त्यांनी दिव्यांग पत्रकार नवनाथ आडे यांच्याशी सार्वजनिक ठिकाणी अमानुष वर्तन केल्याचा गंभीर आरोप आहे. या घटनेमुळे पीडित पत्रकाराची मानसिक स्थिती ढासळल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.



गुन्हा दाखल होऊन एक महिन्याहून अधिक कालावधी उलटून गेला असला, तरी पोलिसांनी अद्याप आरोपीला अटकेची प्रक्रिया केली नाही. मात्र आता या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाने कायदेशीर प्रक्रियेनुसार कार्यवाही करत लवकरात लवकर आरोपीला अटक करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नवनाथ आडे यांनी या प्रकरणात पोलीस प्रशासनासोबतच एसबीआयच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडेही पाठपुरावा करत संबंधित व्यवस्थापकाला निलंबित करण्याची मागणी केली आहे. मात्र अद्याप ठोस निर्णय न झाल्याने त्यांनी आता अधिक ठाम भूमिका घेतली आहे.

यासंदर्भात त्यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांच्याकडे लेखी निवेदन देत स्पष्ट इशारा दिला आहे की, पुढील ५ दिवसांत आरोपीला अटक करून योग्य कारवाई करण्यात यावी, अन्यथा उमापूर पोलीस चौकीसमोर लोकशाही मार्गाने आमरण उपोषणाला बसणार आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, दिव्यांग व्यक्तीच्या न्यायासाठी प्रशासन किती तत्परतेने कार्य करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नागरिकांमधूनही न्यायासाठी आवाज उठत असून, या प्रकरणात लवकरात लवकर ठोस निर्णय होणे गरजेचे असल्याची भावना व्यक्त होत आहे. जर वेळेत कारवाई झाली नाही, तर या प्रकरणाला मोठे आंदोलनाचे स्वरूप येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, कायद्यावर नागरिकांचा विश्वास कायम ठेवण्यासाठी अशा प्रकरणांमध्ये वेळेत आणि योग्य ती कारवाई होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष पोलीस अधीक्षकांच्या पुढील पावलाकडे लागले असून, येत्या काही दिवसांत या प्रकरणाला निर्णायक वळण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

#### मॅनेजरवर गंभीर गुन्हा दाखल असतानाही निलंबन का नाही?

दिव्यांग पत्रकार प्रकरणात संबंधित बँक मॅनेजरवर अपंग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ च्या कलम ९२ अंतर्गत गंभीर गुन्हा दाखल असतानाही अद्याप कोणतीही अंतर्गत कारवाई न झाल्याने संताप व्यक्त होत आहे. इतक्या गंभीर आरोपांनंतरही संबंधित अधिकारी पदावर कायम ठेवले जाणे ही बाब चिंतेची ठरत आहे. सामान्य कर्मचाऱ्यांवर किरकोळ कारणांवरही तात्काळ निलंबनाची कारवाई केली जाते, मात्र या प्रकरणात मात्र वेगळीच भूमिका का घेतली जात आहे? असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे. बँक प्रशासनाची ही भूमिका नेमकी कोणाच्या दबावाखाली आहे का, अशीही चर्चा रंगू लागली आहे. या प्रकरणात पारदर्शकता राखत तात्काळ चौकशी करून संबंधित मॅनेजरला निलंबित करणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे. अन्यथा प्रशासनावरील विश्वास डळमळीत होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. आता तरी संबंधित बँक प्रशासनाने जागे होऊन तात्काळ निर्णय घ्यावा, संबंधित मॅनेजरला निलंबित करावे अशी मागणी केली जात आहे.

#### पोलीस अधीक्षकांकडे लेखी तक्रार; अटक न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

दिव्यांग पत्रकार नवनाथ आडे यांनी आपल्या प्रकरणात थेट पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करत न्यायासाठी धाव घेतली आहे. चकलांबा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होऊनही अद्याप आरोपीवर ठोस कारवाई न झाल्याने त्यांनी वरिष्ठ पातळीवर हस्तक्षेपाची मागणी केली आहे. तक्रारीत त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, संबंधित आरोपीवर तात्काळ अटक कारवाई करण्यात यावी. तसेच प्रकरणाची गांभीर्याने चौकशी करून न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या तक्रारीमुळे आता पोलीस प्रशासनासमोर जबाबदारी वाढली असून, आता पोलीस अधीक्षक कोणती भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## लिंबागणेशकरांची आर्तहाक

### मुस्लिम समाजाच्या न्याय हक्कासाठी 'मुस्लिम आरक्षण एल्गार मोर्चात' सहभागी व्हा : डॉ. गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी आरक्षण ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन करत, सकल मुस्लिम समाजाच्या वतीने उद्या दि.१७ एप्रिल रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या एल्गार मोर्चाला लिंबागणेशकरांनी जाहीर पाठिंबा दर्शविला आहे. या पार्श्वभूमीवर अठरापगड जाती-धर्मातील नागरिकांनी न्याय हक्कासाठी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. डॉ. गणेश ढवळे यांनी सांगितले की, हा मोर्चा कोणत्याही



राजकीय पक्षाचा किंवा वैयक्तिक स्वार्थासाठी नसून तो संपूर्ण मुस्लिम समाजाच्या न्याय हक्कासाठी आहे. समाजातील शैक्षणिक व सामाजिक मागासलेपण दूर करण्यासाठी शिक्षण, नोकरी तसेच विविध शासकीय योजनांमध्ये मुस्लिम समाजाला ५ टक्के आरक्षण मिळावे, ही दीर्घकाळापासूनची व न्याय्य मागणी असल्याचे त्यांनी नमूद केले. पुढील पिढीचे भवितव्य सुरक्षित ठेवण्यासाठी हा लढा आवश्यक असून, या ऐतिहासिक आंदोलनात सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी डॉ. गणेश ढवळे, सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ गिरे, रविंद्र निर्मळ, विक्रांत वाणी, औदुंबर नाईकवाडे, अर्जुन घोलप, शेख शफी,नूर सय्यद, बाळासाहेब मुळे, समीर शेख, सय्यद अख्तर, सय्यद बशीर, रामदास मुळे, सुरेश निर्मळ, गणपत तागड, शेख शफीक, सय्यद सलीम, शेख वसीम, शेख उस्मान, सय्यद फिरोज, सय्यद रियाज, सय्यद ताहेर, सय्यद रूऊफ, सय्यद सालम, उमर शेख, सय्यद नाझीम, शेख बबलू, सय्यद आरेफ, शेख नाझीम, शेख शौकत, सय्यद आयुब, भास्कर आबदार, बबन गोंडे आदींसह इतर नागरिक उपस्थित होते.

## मुस्लिम आरक्षण मोर्चाला संभाजी ब्रिगेडचा जाहीर पाठिंबा

**बीड । प्रतिनिधी**




मुस्लिम समाजाला शिक्षण आणि नोकरीत आरक्षण मिळावे या मागणीसाठी १७ एप्रिल रोजी बीड शहरात भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाला संभाजी ब्रिगेड, बीड जिल्ह्याच्या वतीने अधिकृतपणे जाहीर पाठिंबा घोषित करण्यात आला आहे. संभाजी ब्रिगेडने नेहमीच बहुजन आणि अल्पसंख्याक समाजाच्या न्याय्य हक्कासाठी भूमिका घेतली आहे. मुस्लिम समाजातील तरुणांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे या आंदोलनात संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सक्रिय सहभागी होऊन आपला पाठिंबा दर्शवतील, असे जिल्हा शाखेच्या वतीने कळवण्यात आले आहे.

# "नारी शक्ती वंदन अधिनियम" महिलांचा सन्मान, समानता आणि सक्षमीकरण

### लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदिजींचे मनपूर्वक आभार : सुवर्णाताई लांबरुड

**बीड । प्रतिनिधी**

'नारी शक्ती वंदन अधिनियम, २०२३' हा ऐतिहासिक निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आला. २१ सप्टेंबर २०२३ रोजी संसदेत मंजूर होऊन २८ सप्टेंबर रोजी राष्ट्रपतींची मंजुरी मिळाल्यानंतर हा कायदा अस्तित्वात आला. या कायद्यानुसार लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण देण्यात आले आहे. 'नारी शक्ती वंदन अधिनियम' हे महिलांच्या सक्षमीकरणाच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असे पाऊल आहे. यामुळे महिलांना राजकारणात अधिक संधी मिळतील, त्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि त्या समाजाच्या प्रगतीत अधिक प्रभावीपणे योगदान देऊ शकतील. एकंदरीत, महिलांचे सक्षमीकरण हे समाजाच्या एकूण विकासासाठी अत्यावश्यक आहे, आणि हा अधिनियम त्या दिशेने उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. हा ऐतिहासिक निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा महिलांवरील दृढ विश्वास दर्शवतो. महिलांच्या सक्षमीकरणासाठी घेतलेले हे पाऊल निश्चितच देशाच्या प्रगतीसाठी मोलाचे ठरेल. यासाठी त्यांचे मनःपूर्वक आभार मानणे आवश्यक आहे. 'नारी शक्ती वंदन अधिनियम' हा केवळ एक कायदा नसून महिलांच्या सन्मान, समानता आणि सक्षमीकरणाचा नवा अध्याय आहे. मातृशक्तीवरील विश्वासातून भारत अधिक सक्षम, समताधिष्ठित आणि प्रगत राष्ट्र म्हणून पुढे जाईल, यात शंका नाही. प्रदेश भाजपा, लोकनेत्या ना.पंकजाताई मुंडे, माजी खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या सुचनेनुसार व भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली व महिला जिल्हाध्यक्षा सुवर्णाताई लांबरुड यांच्या उपस्थितीत नारी शक्ती वंदन कार्यक्रमा निमित्त भारतीय जनता पार्टी बीड जिल्हा महिला मोर्चा / आघाडीच्या वतीने स्वाक्षरी मोहीम, प्रभात फेरीसह मोदिजींना



धन्यवाद देण्यात आले. यावेळी मीराताई गांधले, ॲड. संध्याताई राजपूत, ॲड. भाग्यश्रीताई ढाकणे, ॲड. संगीताताई धसे, संध्याताई मिश्रा, रुक्मिणीताई शिराळे, शालिनी परदेशी, लताताई राऊत, कल्पनाताई अहिरे, वच्छला काळे, सुनीता विद्यागर, श्रद्धा खंडागळे, मेघना घुले, सविता भालेराव, मंदाकिनी सोनवणे, योजना स्वामी, रेखा चव्हाण, कोमल राजपूत, सुजाता कांबळे, निता कांबळे, सुशीला ठोंबरे, कविता साबळे, संध्या भोसले, प्रिया भोले यांच्यासह शेकडो महिलांनी सहभाग घेतला.